REGISTERED No. B. 34:4

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. [illegible]
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० | पुणें, बुधवार, तारीख १७ मे, १९४४ | अंक २०

★ **नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी** ★

[illegible], [illegible] कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
[illegible], [illegible], कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस्,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट,

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर ★ हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिल्लकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई

पुण्यांतील
**आदर्श निवासस्थान व भोजनालय**
**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

**भांडवल**

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ५,००,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४[illegible]% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

# विविध माहिती

### युरोपची लूट

फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, डेन्मार्क, नॉर्वे, झेकोस्लोव्हाकिया, सर्बिया इत्यादि देशांची लूट करून जर्मनीनें त्यांचें सुमारें ८० अब्ज रुपयांचें नुकसान केलें आहे, अशी माहिती मि. डिंगल फूट ह्यांनीं ब्रिटिश कॉमन्स सभेंत सांगितली.

### सारख्या कामास सारखें वेतन

एकच काम करणाऱ्या स्त्रियांस व पुरुषांस सारखेंच वेतन मिळावें किंवा काय, ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी ब्रिटिश सरकारनें एक बादशाही कमिशन नेमलें आहे.

### हिंदी शास्त्रज्ञांची इंग्लंडला भेट रद्द

कांहीं प्रमुख हिंदी शास्त्रज्ञांस ग्रेट ब्रिटनमध्यें जाण्याचें निमंत्रण करण्यांत आलें होतें, परंतु वहातुकीच्या अडचणींस्तव त्यांचें जाणें तूर्त स्थगित करण्यांत आलें आहे.

### सक्कर धरणाच्या कर्जाची फेड

सिंध सरकारास मध्यवर्ती सरकारकडून कांहीं रक्कम दरसाल मिळत असते, त्याची व सिंध सरकारचें सक्करच्या धरणाबाबत कर्ज ह्यांची वजावट करून, ५ कोटि ७० लक्ष रुपये एका रकमेनें सिंधनें मध्यवर्ती सरकारास दिले तर ते मध्यवर्ती सरकार स्वीकारण्यास तयार आहे.

### दहा दिवस पोस्ट पार्सलें बंद

ता. १५ मे पासून पुढें दहा दिवस हिंदुस्थानांत कोठेंहि पाठविण्याचें पार्सल मुंबई, पुणें, अहमदाबाद, सुरत, बडोदें व नवसरी ह्यांतील कोणत्याहि पोस्टांत स्वीकारलें जाणार नाहीं. सरकारी, लष्करांतील लोकांस धाडलेलीं व औषधाचीं पार्सलें ह्यांस वरील तहकुबी लागू नाहीं.

### धोकादायक इमारती पाडण्याचें काम

मुंबई शहरांतील स्फोटामुळें अर्धवट नाश पावलेल्या धोक्याच्या इमारती पाडून टाकण्याचें काम चालू आहे. सुमारें एक हजार लोक ह्या कामांत गुंतले आहेत.

### अमेरिकेस लागणाऱ्या पेट्रोलची तरतूद

युद्धसमाप्तीनंतर अमेरिकेस पेट्रोलचा मुबलक पुरवठा व्हावा, ह्या दृष्टीनें अमेरिकेंत पेट्रोलचें उत्पादन वाढविण्याचा कसून प्रयत्न करणें, पेट्रोलचा वापर अधिक कार्यक्षम रीतीनें करणें, परदेशांतील पेट्रोल मिळविण्याबद्दल निर्धास्त रहातां येईल असें आश्वासन मिळविणें व जगभर महत्त्वाच्या केंद्रांतून तातडीच्या वेळीं उपयोगी पडतील असे साठे तयार ठेवणें, अशी उपाययोजना अमेरिकेचें पेट्रोल ॲडमिनिस्ट्रेटर ह्यांनीं सुचविली आहे.

### मिसेस विन्गेट ह्यांस पुत्र

ब्रह्मदेशांत जपान्यांचे पिछाडीस विमानमार्गें उतरणाऱ्या तुकडीचा धाडसी नायक, मेजर जनरल विन्गेट, हे मार्च १९४४ मध्यें विमानाच्या अपघातांत ब्रह्मदेशांत मरण पावले. त्यांची पत्नी बाळंत होऊन तिला नुकतीच पुत्रप्राप्ति झाली आहे.

### मुंबई-अहमदाबाद रस्ता

मुंबई व अहमदाबाद ह्यांस जोडणाऱ्या रस्त्यापैकीं मुंबई ते अंकलेश्वर ह्या रस्त्यावर वहातुक सुरू आहे. हाच रस्ता पुढें रजपुतान्यांतून जाऊन दिल्ली गांठणार आहे.

### लष्करी वाहनांची विल्हेवाट

हजारों लष्करी वाहनें लष्करी कामास निरुपयोगी होतील, त्यांची विल्हेवाट लावण्याच्या संबंधांत हिंदुस्थान सरकारचे सप्लाय मेंबर, सर ए. रामस्वामी मुदलियार, हे हितसंबंधी लोकांचा सल्ला घेत आहेत. लवकरच २० हजार वाहनें उपलब्ध होतील व कालांतरानें लक्षावधि वहानें निकालांत काढावीं लागतील. हीं वाहनें लागलींच वहातुकीस उपयोगी पडूं शकतील, अशी खात्री नाहीं. त्याचप्रमाणें, ह्या वाहनांना पेट्रोल, धांवा, वगैरेचा पुरवठा करण्याचाहि प्रश्न उपस्थित होईल.

### चेक्सची देवघेव

५ मे, १९४४ अखेर संपलेल्या आठवड्यांत मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें ४२ कोटि, ५८ लक्ष रुपये किंमतीच्या १,४०,२६३ चेक्सची देवघेव झाली.

### एका वर्षांत १,२७,००० विमानांचें उत्पादन

गेल्या वर्षी अमेरिका व ब्रिटिश साम्राज्य ह्यांत मिळून १,२७,००० विमानांचें उत्पादन झालें.

### बोरगांव अपघातांतील आरोपींची शिक्षा रद्द

अकोल्याजवळ बोरगांव येथें ३ जून, १९४३ रोजीं मुंबई मेलला अपघात होऊन त्यांत १०० उतारू मरण पावले व २०० उतारू जखमी झाले. अकोल्याचा अ. स्टेशन मास्तर, गाडीचा ड्रायव्हर व गार्ड ह्यांवर खटला करण्यांत येऊन त्यांस शिक्षा झाली. त्यावर त्यांनीं नागपूर हायकोर्टाकडे अपील केलें. गव्हर्मेंट ऑफ इंडिया कायद्याच्या २७० व्या कलमाप्रमाणें आरोपी हे सरकारी नोकर असल्याकारणानें, त्यांवर खटला भरण्यापूर्वी गव्हर्नर जनरलची परवानगी अगाऊ घ्यावयास हवी होती, ती घेतली नाहीं, ह्या मुद्यावर हायकोर्टानें आरोपींची शिक्षा रद्द केली.

### तुंगभद्रा नदीच्या पाण्याची वाटणी

तुंगभद्रा नदीवर धरण बांधण्याची योजना मद्रास सरकारनें १९३० सालीं तयार केली. ह्या धरणाच्या पाण्याच्या वाटणीसंबंधीं मद्रास व म्हैसूर सरकारांत वांधा उपस्थित झाला व १४ वर्षांनीं तो आतां मिटला आहे. पाण्याच्या वाटणीसंबंधीं दोन्ही सरकारांच्या प्रतिनिधींचें एकमत झालें आहे. नियोजित धरणास २० कोटि रुपये खर्च येईल. धरणांतील पाण्याच्या साठ्याची बरोबरी जगांतील कोणत्याहि धरणाच्या पाण्याचा साठा करूं शकणार नाहीं. तुंगा आणि भद्रा हे दोन लहान प्रवाह मिळून तुंगभद्रा नदी झाली आहे व ती कृष्णा नदीस मिळते. तुंगभद्रा ही म्हैसूर व मुंबई प्रांताची सरहद्द असून पुढें मुंबई व मद्रासची हद्द आहे.

### कपाशीच्या उत्पादनांत वाढ

हिंदी कपाशीच्या १९४३–४४ मधील उत्पादनांत ८% वाढ होऊन तें ५०,७८,००० गांठी होईल, असा अंदाज आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | १५४ | महात्मा गांधींची मुक्तता—ब्रि. औद्योगिक धोरणाचें अनुकरण—सुवर्ण परिमाणाची इतिश्री—ब्रिटिश आणि अमेरिकन चलन—चीनमधील चलनाची दुर्दशा | |
| २ बिर्ला शेटजींची औद्योगिक धोरणावर टीका | १५५ | ७ शेडयूल्ड बँकांच्या शाखांत वाढ | १५९ |
| ३ आयुर्विमा कंपन्या व... व्याजाचे दर | १५६ | ८ जननसंख्या कशी वाढेल ! | १५९ |
| ४ हिंदी आर्थिक परिस्थिति | १५६ | | |
| ५ इंग्लंडमध्येंहि द्रिव्यांची चोरी | १५६ | | |
| ६ स्फुट विचार | १५७ | | |



# अर्थ

बुधवार, ता. १७ मे, १९४४


## बिर्ला शेटजींची सरकारी औद्योगिक धोरणावर टीका

मूलग्राही स्वरूपाचे आणि मोठ्या प्रमाणावर चालणारे कारखाने व धंदे हिंदुस्थानांत स्थापन झाल्यावांचून ह्या देशाची आर्थिक उन्नति शक्य नाहीं ह्याविषयीं आतां दुमत नाहीं. असे नवे धंदे निघण्यास युद्ध परिस्थिति अनेकवेळां कारणीभूत होत असते असा अनुभव आहे. जरूरीच्या वस्तू नेहमीप्रमाणें परदेशांतून येणें बंद होणें आणि युद्धोपयोगी सामुग्री तयार करण्याची निकड भासणें हीं कारणें अशा प्रकारच्या औद्योगिक प्रगतीस परिपोषक होत असतात. पूर्व एशियांत जपानच्या विरुद्ध होणाऱ्या संग्रामांत हिंदुस्थान हें अत्यंत सोयीचें असें लढाऊ साधनांच्या पुरवठ्याचे केंद्र बनवलें जाणें स्वाभाविक होतें. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून इकडे येणाऱ्या मालाच्या मार्गांत वहातुकीच्या अडचणी शत्रूनें निर्माण केल्या होत्या, त्यामुळेंहि औद्योगिक उत्पादनाचे दृष्टीनें विशेष महत्त्व प्राप्त झालें, तथापि मोठया कारखान्यांच्या दृष्टीनें हा देश अत्यंत मागसलेला आहे. रसायनें, इंजिनें, यंत्रें, मोटारी, जहाजें, विमानें असल्या जातींचा लढाऊ उपयोगाचा माल येथें बनवला जाण्यासारखी परिस्थिति नव्हती. ब्रिटिश आणि अमेरिकन सरकारांनीं ह्या गोष्टींचा विचार करून हिंदुस्थानास मोठ्या प्रमाणावर उत्पादनक्षम करण्याविषयींच्या योजनांची तज्ज्ञांकडून छाननी करवली. रोजर मिशन आणि ग्रॅडी मिशन हीं तज्ज्ञांची मंडळी हिंदुस्थानांत येऊन चौकशी करून स्वदेशी परत गेली. त्यांनीं स्वतःचा अभिप्राय आपापल्या सरकारांस निवेदन केला. हिंदुस्थानचें प्रचंड प्रमाणावर आतां औद्योगीकरण होणार अशी आशा येथें वाटूं लागली, पण ती लवकरच मावळली. तज्ज्ञांनीं शिफारसी काय केल्या आणि त्यांवर ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं कोणतें मत बनवलें हें त्यांचे रिपोर्ट प्रसिद्ध न झाल्यानें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु ज्या अर्थी त्यांच्या खटाटोपाचे प्रत्यक्ष व्यावहारिक परिणाम कांहींच दृष्टिगोचर झाले नाहींत, त्या अर्थी हिंदुस्थानांत मोठाले युद्धोपयोगी धंदे व कारखाने स्थापन करणें श्रेयस्कर व शक्य नाहीं असा अखेरचा निर्णय झाला असला पाहिजे हें उघड होतें. दारूगोळ्यासारखी कांहीं युद्धसामुग्री बनवण्याचे यशस्वी प्रयत्न येथें झाले असून जहाजें व विमानें बांधण्याचाहि उपक्रम करण्यांत आलेला आहे. तथापि, हिंदुस्थानच्या प्रचंड प्रमाणावरील औद्योगीकरणाची मूळची कल्पना सोडून देण्यांत आली आहे यांत संशय नाहीं.

ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दक्षिण आफ्रिका इत्यादि देशांत तेथील सरकारांच्या प्रोत्साहनानें व सहाय्यानें युद्धपरिस्थितींत लढाऊ सामानाच्या उत्पादनासाठी कारखान्यांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. तसा प्रयत्न हिंदुस्थानांत न केला गेल्यामुळें येथील सरकारानें देशाच्या औद्योगीकरणाची सुवर्णसंधि गमावली अशी टीका हिंदी धंदेवाल्यांनीं केली असून, ती चालू ठेवली आहे. नवीन औद्योगिक मंडळ्यांनीं भांडवल जमा करण्याचे बाबतींत हिंदुस्थान सरकारनें निर्बंध घातले आहेत त्यांचेविषयीं असमाधान व्यक्त केलें जात आहे. समाजांत खेळणाऱ्या पैशाचा ओघ आपल्या तिजोरीकडे आकर्षण्याचें आणि त्या उपायानें महागाईस आळा घालण्याचें सरकारचें धोरण प्रसिद्ध आहे. त्यास अनुसरून ज्याचा उपयोग तात्काळ औद्योगिक उत्पादनाकडे होऊं शकत नाहीं अशा भांडवलास त्यानें मर्यादा घातल्या आहेत, पण युद्धसमाप्तीपर्यंत त्याची गुंतवण सरकारी रोख्यांत केली जाण्याच्या अटीवर कंपन्यांनीं तें उभारण्यास सरकारनें मुभा ठेवली आहे. युद्धोपयोगी धंद्यांसाठी आणि मामुली उपयोगांत निकडीच्या कामासाठी भांडवल उभारण्यास व वाढविण्यास परवानगी देण्यांत येते. पूर्वीपेक्षा हें नवीन सरकारी धोरण अधिक उदार वृत्तीचें व शहाणपणाचें आहे असे उद्गार शेट वालचंद हिराचंद ह्यांनीं काढले आहेत, त्यांच्याशीं आपण सहमत नाहीं, असें शेट घनश्याम बिर्ला ह्यांनीं एका पत्रकांत म्हटलें आहे. युद्धोत्तर औद्योगिक पुनर्घटनेच्या योजनेचा पत्ता नाहीं आणि सरकारी रोख्यांत आज गुंतवलेला पैसा नवीन उद्योगधंद्यांत भांडवल म्हणून घातला जाण्याची भाषा बोलली जात आहे. अशा स्थितींत नवीन काढावयाच्या कंपनीनें काय करावें ? असा प्रश्न त्यांनीं विचारला आहे. नवीन कारखाना कोठें काढावा, तो केव्हां उभारावा, तो चालेल कीं बंद करावा लागेल, ह्याची भांडवलवाल्यांस कांहींच कल्पना नसल्यानें हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाचें भवितव्य अत्यंत अनिश्चित आहे. विशिष्ट हेतू मनांत धरून धाडशी व कल्पक धंदेवाल्यांनीं नवीन कारखान्यांसाठी भांडवल गोळा केलें तर त्या पैशाचें पुढें काय होणार हें समजणें शक्य नसल्यामुळें लोकांनीं कशाच्या आधारावर औद्योगिक योजनांस हात घालावा ? अशी बिर्ला शेटजींची पृच्छा आहे. परदेशीय भांडवलवाल्यांच्या मार्गांत मात्र ह्या तऱ्हेच्या अडचणी नाहींत आणि अमेरिकन व ब्रिटिश कारखानदारांस स्वतःच्या देशांत भांडवल उभारून हिंदुस्थानांत धंदे काढतां येतील किंवा वाढवतां येतील. असें झालें म्हणजे हिंदी धंदेवाल्यांस स्वतःच्या भांडवलाचा व कर्तबगारीचा उपयोग करण्यास वाव राहिला नाहीं असें आढळून येईल. ह्या रीतीनें परकी भांडवलवाल्यांच्या धंद्यांची पोळी पिकेल आणि स्वदेशी धंदेवाल्यांची कुचंबणा होईल अशी भीति बिर्ला शेटजींनीं व्यक्त केली आहे. ही भीति दूर होण्यास दोन गोष्टींची आवश्यकता आहे. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेची बहुमतसंमत अशी योजना लवकर तयार केली जाणें आणि राष्ट्रीय वृत्तीच्या मंत्रिमंडळाच्या हातीं तिची अंमलबजावणी दिली जाणें ह्या त्या होत. युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय आर्थिक घटनेंत हिंदुस्थानास योग्य स्थान प्राप्त झालें पाहिजे आणि त्या विषयींची योजना हिंदी राष्ट्रानें स्वतःच्या गरजांस अनुसरून आखून ती फलद्रूप होण्याची तयारी ठेवली पाहिजे. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या हितास जपत आहे आणि पुढें जपेल. ह्या नियमास हिंदुस्थान अपवाद होऊन कसें चालेल ! शेट बिर्ला ह्यांच्या पत्रकाचें हेंच सार आहे.

## आयुर्विमा कंपन्या व उतरते व्याजाचे दर

आयुर्विमा कंपन्यांचा कारभार किफायतशीरपणें चालणें ही गोष्ट त्यांचे संबंधांतील व्याजाचे दर, हप्त्यांचे दर, मृत्यूचें प्रमाण, खर्चाचें प्रमाण इत्यादिविषयक अंदाज बरोबर ठरण्यावर अवलंबून रहातें. सध्या हिंदुस्थानांतील कित्येक विमा कंपन्या व्याजाचे दर कमालीचे उतरले असल्याकारणानें तोट्यांत येण्याचा संभव निर्माण झाला आहे. मृत्यूंचें प्रमाण काय येईल याचा हिशेब करतां येतो व खर्चावरहि नियंत्रण घालणें शक्य असतें. परंतु, व्याजाच्या दराविषयीं दीर्घकालीन अंदाज करणें सोपें नसतें व ह्यासंबंधांतील अपेक्षा चुकल्या, म्हणजे कठीण प्रसंग निर्माण होतो. हिंदी विमाकंपन्यांना १९१२ सालीं ६·२६% व्याज मिळालें, तेथून व्याजाचा दर एकसारखा खालीं चालला आहे. १९४१ सालीं तो ४·१७% वर आला व त्याची खालीं जाण्याची प्रवृत्ति अद्याप कायम आहे. विमाकंपन्यांचें मूल्यमापन आजवर ५% किंवा ४½% दरानें केलें तें ठीक झालें. परंतु आतां तें ३½% दरानें केलें तर कांहींच्या हिशेबांत तूट दिसणें क्रमप्राप्तच आहे आणि बोनसचे दर उतरणें किंवा बोनस अशक्यप्राय होणें स्वाभाविक आहे. पूर्वी भारी दरानें गुंतविलेल्या रकमा सुटत्या होत गेल्या म्हणजे त्या आतां कमी व्याजानें गुंतवाव्या लागतात व सहाजीकच त्यांत व्याजाचें नुकसान होतें. वाढत्या कराच्या बोजाचा परिणामहि विमाकंपन्यांस सोसावा लागत आहे व सरकारी रोख्यांतील सक्तीच्या गुंतवणुकीमुळें कंपन्यांना मोठाल्या रकमा कमी व्याजानेंच ठेवणें आवश्यक झालें आहे. विमाकंपन्यांना पडणाऱ्या प्रत्यक्ष दरापेक्षा सुमारें २½% कमी दरानें मूल्यमापन करण्याची ग्रेटब्रिटनमधील कंपन्यांची सावधगिरीची पद्धति आहे, परंतु तशी कूस येथील कंपन्यांच्या मूल्यमापनाचे संबंधांत राखण्यांत आलेली नसल्याकारणानें, ज्या परिस्थितींत ब्रिटिश कंपन्या बोनसचा दर कमी करतील किंवा बोनस देणार नाहींत, त्याच परिस्थितींत हिंदी कंपन्या तूट दाखवूं लागतील. ३½% च्या दरानें सध्यां मूल्यमापन करून व ह्यापुढेंहि सावधगिरीच्या दरानें मूल्यमापन करून हिंदी कंपन्यांना आपली मजबुती वाढविण्यास प्रारंभ करण्यास सध्याचा समय सोईचा आहे. मात्र, असें करण्यास त्या समर्थ व्हाव्या, ह्या दृष्टीनें सरकारी विमाखात्यानें हिंदी कंपन्यांकडे सहानुभूतिपूर्वक पाहिलें पाहिजे आणि सर्वांगीण पद्धतशीर प्रगति दाखविणाऱ्या कंपन्यांस सवड दिली पाहिजे.

---

### धान्य पेरण्याची तुटीच्या क्षेत्रांत सक्ती

धान्याची स्थानिक तूट भरून यावी व धान्याची लागवड वाढावी, ह्या उद्देशानें मुंबई प्रांतांतील कांहीं जिल्ह्यांच्या कांहीं तालुक्यांत शेतकऱ्यांनीं आपल्या शेतांच्या किमान दोन तृतीयांश क्षेत्रांत धान्याचीच लागवड केली पाहिजे व आपल्या शेताच्या एक षष्ठमांशापेक्षा जास्त जागेंत कपास, तंबाखू व अंबाडी पेरतां कामा नये, असा हुकूम काढण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. हा हुकूम महाराष्ट्रांतील एकाच जिल्ह्यास—पूर्व खानदेश—लागू पडेल व त्यांतील अमळनेर, चाळिसगांव, एरंडोल, जळगांव, जामनेर, पारोळा, यावल, भुसावळ, एदलाबाद, रावेर, भडगांव, चोपडें व पाचोरा हे तालुके त्या हुकुमाखालीं येतील.

## गेल्या वर्षांतील हिंदी आर्थिक परिस्थिति

एक्सचेंज बँकांचा व्यवहार किफायतशीर होणें हें त्या ज्या देशांत व्यवहार करतात, त्या देशाच्या आर्थिक समृद्धीवर अवलंबून आहे. हिंदुस्थानांतील लोकांची क्रयशक्ति सुधारावी व ह्या देशाचा परराष्ट्रीय व्यापार वाढावा, अशी एक्सचेंज बँकांची सहाजीकच इच्छा असते. चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना ह्या बँकेचे अध्यक्ष मि. ग्रन्थॅम, ह्यांनीं गेल्या वर्षीच्या आपल्या बँकेच्या व्यवहाराचा आढावा घेतला, त्यांतील हिंदुस्थानासंबंधींचा भाग खालीं उद्धृत केला आहे :—

"गेलें वर्ष हिंदी आर्थिक प्रगतीस पोषक असें होतें. युद्धप्रयत्नाच्या शिकस्तीमुळें औद्योगिक प्रगतीस चालना मिळाली. ग्रेटब्रिटन व इतर देश ह्यांतून होणारी आयात कमी झाली व हिंदी कच्चा माल व तयार माल ह्यांस परदेशीं भरपूर व तातडीची मागणी आली. सहाजिकच, हिंदुस्थानाची बरीच भरभराट झाली. परंतु त्याबरोबरच चलनवृद्धि व भयंकर महागाई ह्यांचीहि आपत्ति आल्यामुळें भरभराटीमध्यें सर्वांस सारखा वाटा मिळाला नाहीं आणि कांहींची दुर्दशा टळूं शकली नाहीं. कांहीं लोकांच्या हातामधील क्रयशक्ति वाढली, तर बाजारांत मालाचा तुटवडा पडल्यामुळें त्याचा दुष्परिणामहि वाढला. मोठी कर्जउभारणी किंवा विशेष कर ह्यांचे अभावीं, शेतीचें उत्पादन जरी पुष्कळ वाढलें असतें तरी त्यानें परिस्थिति निवळली असती. असमाधानकारक स्थानिक पिकें व वहातुकीच्या अडचणी ह्यांमुळें कांहीं भागांत दुष्काळ पडला. गव्हाच्या आयातीमुळें अन्नपरिस्थिति आतां बरीच सुधारली आहे व चलनवृद्धीच्या प्रवृत्तीस आळा घालण्याचें सोनेंविक्रीसारखे प्रयत्न चालूं आहेत. तथापि धान्याचीं पिकें वाढविण्याची उपाययोजना तात्काळ हातीं घेतली जाणें अगत्याचें आहे. कारण, ह्यापुढें पूर्वीपेक्षां जास्त प्रमाणांत हिंदुस्थानास अन्नाचे बाबतींत स्वतःवरच विसंबून रहाणें भाग पडणार आहे."

---

### इंग्लंडमध्येंहि दिवे चोरीस जातात.

आगगाड्या, सार्वजनिक संडास, इत्यादि ठिकाणच्या दिव्यांची चोरी होत असल्यामुळें नुकसान फार मोठें होतें व लोकांचीहि अतिशय गैरसोय होते. अशा तऱ्हेचें वर्तन हिंदुस्थानांतच घडतें व इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशांतील लोकांची नीतिमत्ता वरच्या प्रतीची असते, असें सर्वसाधारण अनुमान काढणें चुकीचें असतें. विशिष्ट परिस्थितीस अनुसरूनच सर्व गोष्टी घडत असतात. लंडन, मिडलंड अँड स्कॉटिश रेल्वे कंपनीचे अध्यक्ष, ने. ना. लॉर्ड रॉयडेन, ह्यांनीं आपल्या रेल्वेवरील चोऱ्यांचा उल्लेख कंपनीच्या वार्षिक सभेंत केला. शक्य तेवढी खबरदारी घेतली, तरी चोऱ्यांची संख्या वाढत आहे, अशी त्यांनीं तक्रार केली. काळा बाजार व त्यास माल पुरविणारे दलाल ह्यांच्या व्यवहाराचा हा परिणाम आहे. सहज उचलून घेतां येतील अशा वस्तू आगगाड्यांतून पुरविणें अशक्य झालें आहे, असें ते म्हणाले. विजेच्या दिव्यांची चोरी तर विशेष निषेधार्ह आहे, कारण हे दिवे कमी व्होल्टेजचे असल्यानें त्यांचा दुसरा उपयोग होऊं शकत नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. बाकांच्या गाद्या फाडण्यांत व खिडक्या फोडण्यांत दिसून येणाऱ्या प्रवृत्तीस काय म्हणावें, हेंच लॉर्ड साहेबांना सुचत नाहीं. अशा रीतीनें होणारें नुकसान बरेंच भरतें, परंतु तें थांबविण्याचा उपाय दिसत नाहीं असे त्यांनीं उद्गार काढले. सार्वजनिक नीतिमत्ता व नागरिकत्व ह्यांचे संबंधांत आदर्श गणल्या जाणाऱ्या ग्रेट ब्रिटनमधील प्रकारांचें वरील वर्णन उद्बोधक आहे. युद्धपरिस्थितीमुळें जनतेच्या मनाची होणारी चमत्कारिक परिस्थिति, हीच त्याच्या बुडाशीं आहे.

# स्फुट विचार

## महात्मा गांधींची मुक्तता

हिंदुस्थानच्या पूर्व सीमेच्या आंतील प्रदेशांत ठाण मांडून बसण्याची शिकस्त जपान करीत असतां आणि पूर्व एशियांतील त्या शत्रूनें व्यापलेल्या विस्तीर्ण भूविभागांतून त्याचें उच्चाटण करणें अगत्याचें असतां ह्या देशामधून सैनिक व युद्धसामुग्री ह्यांच्या पुरवठ्याचा ओघ अविरत वाहत ठेवणें कर्तव्यप्राप्त आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. लढाऊ साधनांचा पुरवठा हिंदी उद्योगधंदे, व्यापार व एकूण आर्थिक परिस्थिति ह्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे ह्या विषयींहि मतभेद असण्याचें कारण नाहीं. तसेंच जनतेमध्यें उत्साहपूर्ण सहकार्याचें वातावरण पसरणें युद्ध प्रयत्नास परिपोषक आहे आणि त्यासाठी लोकांच्या जीवनास लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचा समाधानकारक व संघटित पुरवठा केला जाण्याचें महत्व सर्वांस पटलें आहे. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेच्या योजनांची चर्चा देशांत चालली आहे आणि ह्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची व युद्धप्रयत्नाच्या तशाच महत्वाच्या बाबी वर निर्दिष्ट केल्या आहेत त्यांची नीट विल्हेवाट लागण्यास मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत लोकमतानुवर्ती राज्यव्यवस्था स्थापन झाली पाहिजे असा प्रचार देशाचे पुढारी करीत आहेत. महात्मा गांधींच्या प्रकृतीचें मान मर्यादेपलीकडे बिघडल्यानें केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन आपण त्यांस बिनशर्त मुक्त केलें असल्याचें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. ह्या मुत्सद्दीगिरीच्या व मनोदार्याच्या धोरणाबद्दल अखिल हिंदुस्थान व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हल, ह्यांस धन्यवाद देत आहे आणि महात्माजींस पूर्ण आराम वाटो अशी इच्छा व्यक्त करीत आहे. महात्माजींच्या मुक्ततेच्या मुळाशीं भूतदयेच्या व्यतिरिक्त दुसरा कोणताहि हेतु नसला तरी देशांत ऐक्य, लोकशासित राज्यकारभार व अधिक जोराचा व संघटित युद्धप्रयत्न ह्यांस तिच्या योगानें स्फुरण प्राप्त होईल अशी अनेकांची इच्छा व अपेक्षा आहे. युद्धांतून नीट पार पडून हिंदुस्थाननें आपली राजकीय व आर्थिक घटी नीट बसवावी अशी सरकार आणि जनता ह्यांनीं प्रकट केलेली मनीषा आहे. सध्या अनेक हिंदी प्रांतांत जनतेस उत्तरदायी असलेली राज्य व्यवस्था अस्तित्वांत नाहीं आणि लोकशाहीस आवश्यक असलेली व युद्धांतील विजयास उपकारक ठरणारी तात्पुरतीहि एकी पक्षोपपक्षांत नाहीं. जपानचा पाडाव होण्यास ह्या दोन्हींची जरूरी आहे आणि हिंदुस्थानचे आर्थिक प्रश्न सोडवण्यास त्यांचें सहाय होणार आहे. महात्मा गांधींची प्रकृति लवकर सुधारून त्यांची मुक्तता हा विधायक, संघटित व शांततामय कार्याच्या नवीन मनूचा प्रारंभ ठरो असें आम्ही इच्छितों. सरकार आणि जनतेचे पुढारी ह्यांच्या सहकार्यानेंच हें ध्येय गाठतां येणार असल्यानें प्रस्तुत संधीचा योग्य उपयोग त्यांचे हातून होईल अशी आम्हांस आशा आहे.

---

## ब्रिटिश औद्योगिक धोरणाचें अनुकरण करा

हिंदी उद्योगधंद्यांच्या युद्धोत्तर अभिवृद्धीच्या संबंधांत निश्चित असें राष्ट्रीय व सरकारी धोरण निश्चितपणानें आखलें जाण्याचें अगत्य आम्हीं आजच्या अंकांत बिर्ला शेटजींनीं प्रसिद्ध केलेल्या एतद्विषयक पत्रकास अनुलक्षून केलें आहे. प्रस्तुत बाबतींत ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या धोरणाचे अनुकरण ह्या देशांत केलें जाणें इष्ट आहे. टाइम्स ऑफ इंडिया ह्या मुंबईच्या इंग्लिश दैनिकांत एका लेखकानें ब्रिटिश फडनवीसांनीं. आपल्या अंदाजपत्रकावरील भाषणांत नमूद केलेल्या चतुःसूत्रीकडे लक्ष वेधून हिंदुस्थान सरकारनें त्यांच्या पावलावर पाऊल टाकून स्वदेशी धंद्यांच्या उन्नतीस सहाय द्यावें असें सुचवलें आहे. युद्धोत्तरकालीन आर्थिक प्रगतीचीं ब्रिटिश फडनवीसांचीं सूत्रें पुढें नमूद केल्याप्रमाणें आहेत. अन्न आणि इतर जीवनास लागणाऱ्या आवश्यक वस्तूंच्या किंमती उत्पादकांस सरकारी मदत करून मर्यादेंत राखणें हें ह्यांतलें पहिलें सूत्र आहे. जहाजांच्या धंद्यास नवीन यंत्रें बसवण्यासाठीं कर-माफीच्या वगैरे मार्गांनीं उत्तेजन देणें हें ब्रिटिश धोरणाचें दुसरें अंग आहे. तिसरें सूत्र असें आहे कीं शेतीच्या धंद्याची स्थिति बिघडूं नये म्हणून लांब मुदतीचीं कर्जें व अल्प व्याजाचे दर अशा सवलती देऊन शेतकऱ्यांस त्यांच्या आर्थिक सुस्थितीविषयीं आश्वासन देण्यांत येत आहे. चौथ्या सूत्रानें नवीन धंद्यांस मदत देण्यास सरकार स्वतःस बांधून घेत आहे. हें चतुर्विध ब्रिटिश औद्योगिक पुनर्घटनेचें धोरण स्पष्ट आणि समाधानकारक आहे. हिंदुस्थान सरकारनें असें धोरण स्वीकारण्यास आणि तें प्रसिद्ध रीतीनें व्यक्त करण्यास कां कचरावें ? युद्धसमाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध व परिस्थिति ह्यांचे बाबतींत घटना कशी होईल हें सांगणें आज जरी शक्य नसलें तरी देशाची शेती, उद्योगधंद्रे व व्यापार ह्यांच्या गरजांची सर्वांस माहिती आहे आणि तीस अनुसरून युद्धोत्तर आर्थिक धोरण निश्चित करण्यास अडचण वाटण्याचें कारण नाहीं. तपशिलांविषयीं मतभेद होईल, पण उद्दिष्टाविषयीं वाद नाहीं. शेतकरीवर्गाच्या स्थितींत सुधारणा आणि नवीन धंद्यांची स्थापना ह्या गोष्टी निकडीच्या आहेत. त्यांचेवांचून युद्धोत्तर पुनर्घटनेची भाषा बोलणें व्यर्थ आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळाचा ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारनें कित्ता गिरवला पाहिजे.

---

## सुवर्ण परिमाणाची इतिश्री

स्वतःच्या राष्ट्रीय चलनास सोन्याचें अधिष्ठान देण्यांत इंग्लंडनें अग्रतेचा मान मिळविला होता आणि पौंड स्टर्लिंग म्हणजे सोनें हें कोष्टक मोठ्या अभिमानानें त्या देशांत एकाकाळीं मोडण्यांत येत असे. गेल्या महायुद्धानंतर सोन्याचें ब्रिटिश चलन व्यवस्थेंतलें हें स्थान डळमळलें तरी अनुकूल परिस्थिति निर्माण होतांच तें पुन्हां दृढ करण्यांत आलें. चालू युद्धांत ब्रिटिश चलनाचें सोन्याच्या मापानें केलेलें मोल स्थिर राखणें कठिण झालें आणि चलनाच्या आधारस्थानावरून आजला एकदा त्याचें उच्चाटन करावें लागलें; ही स्थिति आज कायम आहे परंतु युद्धोत्तर काळांत ब्रिटिश चलन सोन्याच्या किंमतीवर पुन्हां एकवार आधारणार कीं नाहीं हा प्रश्न आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेची चर्चा चालू असतांना उपस्थित केला जाणें स्वाभाविक आहे. मागचा कटु अनुभव लक्षांत घेऊन त्या प्रश्नास आपण नकारार्थी उत्तर देण्याचें निश्चितपणें ठरवलें असल्याचें ब्रिटिश फडनवीसांनीं कॉमन्स सभेंत स्वतःच्या सरकाराच्या तर्फेनें सांगितलें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ब्रिटिश पौंडाचा सोन्याशीं मुळींच संबंध रहाणार नाहीं असा ह्याचा अर्थ नव्हे. आंतरराष्ट्रीय विनिमयाच्या देण्याघेण्याची विल्हेवाट लावण्यास देशांच्या चलनांचे परस्पर

संबंध निश्चित होणें आवश्यक असतें. सोन्यास जगांत सर्वत्र मागणी असून त्या धातूचे ठिकाणी अनेक गुण आहेत, ह्यामुळें तें सर्वांस ग्राह्य असतें. प्रत्येक देश आपलें चलन सोन्याच्या विशिष्ट वजनाच्या किंमतीइतकें आहे असें ठरवतो. सोन्याचें नाणें प्रत्यक्ष व्यवहारांत वापरतां येण्यासारखी स्थिति नसल्यानें त्याची जागा इतर धातूंची नाणीं व कागदी नोटा ह्यांस दिली जाते आणि ह्या चलनांचा निश्चित सोन्यामध्यें विनिमय होण्याची तजवीज केली जाते. ह्या रीतीनें पदार्थांच्या मोलाचें सोनें हें मापनसाधन होतें आणि त्या योगानें निरनिराळ्या देशांच्या चलनांचा विनिमय ठराविक दरानें करणें सोपें होतें. आंतरराष्ट्रीय देवघेवीचें माध्यम सोनें कां व कसें होतें हें ह्यावरून स्पष्ट होईल आणि इंग्लंडला आपल्या पौंडाचा सोन्याचा आधार सर्वस्वी टाकून देतां येणार नाहीं ह्याचें कारण उघड होईल. तथापि सोन्याच्या किंमतीशीं पौंडाची किंमत जोडणें वेगळें आणि पौंडाच्या मोबदल्यांत सोनें देण्याची जबाबदारी कायदेशीर रीतीनें राष्ट्रीय सरकारानें पत्करणें वेगळें. ही जबाबदारी पार पाडली जाण्यास मोठा सुवर्ण संचय हवा आणि त्याचा आकार आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या परिस्थितीवर अवलंबून रहाणार. हा संचय अपुरा झाल्यास हुंडणावळीच्या दरांत अनिष्ट बदल होऊन राष्ट्राच्या उद्योगधंद्यांस तो प्रतिकूल होण्याचा संभव असतो. ह्याकरितां इंग्लंडमध्यें पूर्ण स्वरूपांतलें सुवर्ण परिमाण पुन्हां प्रस्थापित करावयाचें नाहीं असें ब्रिटिश सरकारानें ठरविलें आहे.

### ब्रिटिश आणि अमेरिकन चलन

जगांत सर्वांत प्रचंड असा सुवर्ण संचय आज अमेरिकेजवळ आहे, ह्या कारणानें आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेंत सोन्यास महत्त्वाचें स्थान देण्याकडे त्या देशाचा कल असणें स्वाभाविक आहे. युद्धामुळें इंग्लंडचा सुवर्णनिधि संपला आहे आणि त्यास परराष्ट्रीय येण्याच्या ऐवजी देणेंच मोठें झालें आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थान वगैरे देशांच्या मोठ्या शिलका पौंडाच्या स्वरूपांत लंडनमध्यें पडून आहेत. युद्धसमाप्तीनंतर ह्या रकमांचें रूपांतर त्या त्या देशांच्या चलनांत व्हावें लागेल तेव्हां पौंडाच्या आंतरराष्ट्रीय किंमतीवर ताण पडेल आणि ती स्थिर ठेवणें कठिण होईल. अमेरिकन डॉलरचें तसें नाहीं. सोन्याच्या प्रचंड निधीचा त्यास भरभक्कम आधार आहे आणि ह्या चलनाच्या मोबदल्यांत इतर देशांची चलनें आणि प्रत्यक्ष सोनें देण्याची अडचण अमेरिकेस यत्किंचितहि भासणार नाहीं. आंतरराष्ट्रीय चलनयोजनेची चर्चा अमेरिकेंत चालली आहे तीमध्यें इंग्लंडनें भाग तर घेतला पाहिजे, कारण ब्रिटिश व्यापार आणि ब्रिटिश साम्राज्यांतलि देवघेवी सुरळीतपणानें चालतील अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी त्या राष्ट्रास वाटत आहे. स्वतःच्या साम्राज्याच्या आर्थिक हितास कोणत्याहि रीतीनें बाधक होणार नाहीं, अशीच चलनव्यवस्था आपण पत्करूं अशी घोषणा कॉमन्स सभेंत ब्रिटिश फडणविसांनीं केली आहे तिचें रहस्य स्पष्ट आहे. कॉमन्स सभेंत झालेल्या वादविवादांत भाग घेणाऱ्या सभासदांनीं ह्याच मुद्यांवर जोर दिला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, राष्ट्रीय धंदे आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळ ह्यांचा अत्यंत निकट असा संबंध आहे आणि इंग्लंडचें आर्थिक व राजकीय भवितव्य त्यावर अवलंबून आहे. इंग्लंडचें चलनविषयक धोरण सावधगिरीचें पण निःस्वार्थी आहे, ह्याचा उलगडा वरील स्पष्टीकरणावरून होईल. अमेरिकन राष्ट्रानें प्रचंड सुवर्णसंचय केला आहे, त्यासाठी त्या राष्ट्रास पुष्कळ स्वार्थत्याग करावा लागला आहे; म्हणून त्या सोन्याची माती होईल अशा आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेचा पुरस्कार इंग्लंडनें करणें श्रेयस्कर नाहीं असें कॉमन्स सभेंत एका सभासदानें बजावलें तें लक्षांत घेण्यासारखें आहे. हिंदी राष्ट्र व हिंदी सरकार ह्यांनीं प्रस्तुत चलनचर्चेंत मन घालून ह्या देशाच्या आर्थिक हितसंबंधांचें रक्षण केलें पाहिजे. हिंदी हुंडणावळीच्या प्रश्नावर मागें रणें माजलीं आहेत ही गोष्ट येथें ध्यान्यांत बाळगली जाणें आवश्यक आहे. रुपया हा पौंडाचा दास न होतां त्यास मानाचें बरोबरीचें योग्य स्थान प्राप्त करून घेण्यास सरकारनें व लोकांनीं झटलें पाहिजे. ह्या कामीं दक्षता बाळगावी तेवढी थोडीच होणार आहे.

### चीनमधील चलनाची दुर्दशा

चीनमध्यें रहाणीच्या खर्चाचें मान १९३९ च्या पहिल्या सहामाहींत १०० होतें असें मानलें तर त्याचा इंडेक्स नंबर ऑगस्ट १९४२ मध्यें ५,२४९ झाला व ऑगस्ट १९४३ मध्यें तो ६,०७४ झाला! "नोटांचा छापखाना चालू ठेवून" असें म्हणण्यापेक्षां परदेशांत नोटा छापून त्यांचीं खोकीं विमानांतून आणवूनच चिनी सरकार अप्रत्यक्ष करवाढ करीत आहे! चलनाचा विस्तार एकाद्या महिन्यांत १०% पेक्षां ज्यास्त झाला नाहीं, म्हणजे परिस्थिति आटोक्यांत आहे, असें समजावें लागतें. चीनच्या परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर १९४२ पासून कायमच आहे, त्यामुळें चीनमधील ज्या लोकांचा खर्च परदेशांतून येणाऱ्या पैशावर अवलंबून असतो, अशांचे हाल आहेत. एका पौंडास पूर्वी इतकेच चिनी डॉलर मिळणार परंतु चिनी डॉलरची स्थानिक किंमत मात्र पार घसरली आहे. ग्रेट ब्रिटनमधून चीनमधील परराष्ट्रीय वकील, लष्करी लोक, मिशनरी संस्था, वर्तमानपत्रांचे बातमीदार इत्यादींसाठी पाठविण्याच्या रकमांवर हुंडणावळीच्या दरांत ५०% सवलत देण्याचें ब्रिटिश सरकारनें गेल्या वर्षी ठरविलें व त्या सवलतींत आणखी वाढ नुकतीच करण्यांत आली आहे. अर्थात्, पूर्वी असलेला चिनी डॉलर व ब्रिटिश पेन्स ह्यांमधील हुंडणावळीचा दर दोन्ही चलनांच्या तुलनात्मक किंमतीच्या प्रमाणांत रहाणें अशक्यच झालें आहे. कारण, वाढत्या महागाईबरोबर चिनी डॉलरची स्थानिक किंमत एकसारखी घसरत चालली आहे. चीनमधील परराष्ट्रीय लोकांच्या सोईसाठी अमेरिकन सरकारच्या चलनी नोटांचा उपयोग करण्यांत येतो, त्यामुळें चिनी चलनास मात्र मदत झालेली नाहीं, कारण अमेरिकन नोटांस मजबूत आधार आहे व त्यांची चिनी काळ्या बाजारांत भरमसाट किंमतीस खरेदी-विक्री होत आहे. अनियंत्रित चलनविस्तारास चीन लवकर आळा घालूं शकण्यावरच तेथील परिस्थितीची दुर्दशा थांबणें अवलंबून आहे.

### युद्धकार्यांत पुरुषांपेक्षां अधिक स्त्रिया

ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धकार्यांत एक कोटि पुरुषांचीं आणि एक कोटि दहा लक्ष स्त्रियांचीं नांवें पटावर दाखल झालीं आहेत. युद्धप्रयत्नांत स्त्रियांचें एवढें संख्याधिक्य दुसऱ्या कोणत्याहि देशांत आढळत नाहीं.

## शेड्यूल्ड बँकांची शाखा वाढ

हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत १९४३ सालच्या पहिल्या नऊ महिन्यांच्या २७३ दिवसांत २७२ शाखांची भर पडल्याचें ५ एप्रिलच्या "अर्थां"त सांगितलेंच आहे. १९४३ च्या शेवटच्या तिमाहीचे आकडे आतां हातीं आले आहेत, त्यावरून ऑक्टोबर ते डिसेंबरच्या ९२ दिवसांत शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत १६० शाखांची आणखी भर पडल्याचें आढळून येतें. म्हणजे १९४३ सालीं शाखांची संख्या १,४५३ वरून १,८८५ वर गेली. रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें नवीन बँका दाखल होत आहेत, त्यांचा समावेश शाखांच्या संख्येंत होऊं लागतो. १९४३ च्या शेवटच्या तिमाहींत ओरिएंट बँक ऑफ कॉमर्स, बँक ऑफ म्हैसूर व डिस्कौंट बँक ऑफ इंडिया ह्या शेड्यूल्ड बँका झाल्या आणि त्यांनीं शाखांच्या यादींत ३५ ची भर घातली.

### थॉमस कुक ॲण्ड सन (बँकर्स) लि. चा व्यवहार बंद

चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत आंध्र बँक लि., मछलिपटम व बँक ऑफ कॉमर्स लि., कलकत्ता, ह्यांना शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला. थॉमस कुक ॲंड सन (बँकर्स) लि. चा व्यवहार ग्रिंडले ॲंड कं. लि. कडे वर्ग झाल्यानें ती बँक शेड्यूलं-मधून गळाली. म्हणजे शेड्यूल्ड बँकांची संख्या ७७ वरून ७८ वर गेली.

### भारत इंडस्ट्रिअल बँकेस मान्यता

पैशाच्या वर्गावर्गीसाठीं सवलत मिळण्यास मंजुरी दिलेल्या बिगर शेड्यूल्ड बँकांच्या यादींत भारत इंडस्ट्रिअल बँक लि. व पंजाब ॲंड काश्मीर बँक लि. ह्यांस प्रवेश मिळाला. अशा मंजूर बिगर शेड्यूल्ड बँकांची संख्या ६७ झाली आहे.

---

## जननसंख्या कशी वाढेल ?

यशस्वी ब्रिटिश लोकांच्या कुटुंबांतील घटकांची संख्या कशी कमी अधिक असते, ह्याची शास्त्रीय पद्धतीनें नुकतीच पहाणी करण्यांत आली. (१) कारखानदारांना मुलें जास्त होतात, तर कलावंत व नट ह्यांस फारच थोडीं होतात. नटांचे विवाह लवकर झाले तरी त्यांचा पगार व त्यांच्या नोकरीची अशाश्वती ह्यांचा अपत्यांच्या संख्येवर प्रतिकूल परिणाम होतो. जे लोक कामासाठीं परदेशीं जातात, त्यांना मुलें कमी होतात. (२) तथापि, ग्रेट ब्रिटनमधील सनदी नोकर व हिंदुस्थानांत आलेला ब्रिटिश सनदी नोकर ह्यांच्या मुलांची सरासरी संख्या सारखीच भरते, कारण २८ व्या वर्षी हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्व्हंटाला त्याच्या ग्रेट ब्रिटनमधील भावंडांचे मानानें दुप्पट पगार मिळतो. परदेशां-तील रहाणीची गैरसोय जादा पगारानें भरून निघते ! लष्करी व नाविक अधिकाऱ्यांना सहाजिकच कमी मुलें होतात. (३) उशीरा विवाह करणारांस मुलेंहि कमी असतात, परंतु तिसाव्या वर्षापर्यंत अखंड परिश्रम करून स्वास्थ्य मिळवून नंतर विवाहबद्ध होणारांस मुलांचा तुटवडा पडत नाहीं. (४) लॉर्डांच्या सभेंतील सभासदांस प्रत्येकीं २·४१ मुलें असतात. पार्लमेंटांतील हुजूर पक्षाच्या सभासदांस प्रत्येकीं सरासरीनें १·९८ मुलें असतात. मजूर पक्षाच्या प्रत्येक सभासदाच्या मुलांची सरासरी १·४४ आहे.

लग्नाचे वेळीं वराचें सरासरी वय ३३ असतें, तें २५ पर्यंत खालीं आणल्यास अपत्यांची संख्या वाढण्यास मदत होईल, कारण तरुण लोक आयुष्यांतील अडचणींस टक्कर देण्यास तयार असतात व त्यामुळें तरुणपणीं संततिनियमन करण्याची फारशी प्रवृत्ति नसते असा तपासणीचा निष्कर्ष आहे.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
*गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट*
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस — पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां — ॲंटी ग्राइप मिक्श्चर
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रें:—मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकानः—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आयुर्वेद रसशाळा
पुणें लि० पुणें ४.

## पुना गेस्ट हाऊस

१०७, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

सर्व्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Yitamins ) युक्त असे
( सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले )

### टोमॅटो केचप ( गोड ) व
### टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिसः ९११ अ सदाशिव, पुणें २.

### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

### ।दत्त कंपनी।

७३५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स
★ रबरी हातमोजे
★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स
★ रबरी वॉशर्स
★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ मांडुर्ली घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
प्र. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांडुर्ली, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.